Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

०४/२०२४

**विषय -** ओळखपत्र परिधान करणेबाबत ...

**संदर्भ -** १) जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे क्र.कार्या.१२/३/सा.प्र./कावि/५३६/२०२३/१७०४ दि. ११/१२/२०२३ रोजीचे पत्र

२) जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे क्र.कार्या.१२/३/सा.प्र./कावि/६३०/२०२३/१७०५ दि. ११/१२/२०२३ रोजीचे पत्र

३) कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.आस्थापना/१७४ दि.२४/०१/२०२४

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, रोजंदारी/हंगामी/एकत्रित मानधनावर कार्यरत असलेले शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व संशोधक विद्यार्थी आणि विद्यार्थी/विद्यार्थीनीनां कळविण्यात येते की, यापूर्वी विद्यापीठ प्रशासनाकडून विद्यापीठ परिसरामध्ये आपले ओळखपत्र आपल्या गळयात दर्शनी भागावर वापरण्याबाबत वारंवार कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापी काही जण ओळखपत्र परिधान करत नसल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास येत आहे. विद्यापीठ परिसरातील सुरेक्षेच्या दृष्टीने ओळखपत्र वापरणे आवश्यक आहे. याअनुषंगाने सर्वांनी आपली ओळखपत्रे परिधान करुन शिस्तिचे पालन करावे. तसेच, सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्वांना ओळखपत्र परिधान करणेबाबत सुचना देवून अमंलबजावणी करावी.

ओळखपत्र परीधान करणे बाबतची अंमलबजावणी प्रशासनाकडून कोटेकोरपणे करण्यात येणार असून या आदेशाचे पालन न करणा-यांवर प्रशासनाकडून कारवाई होवू शकते. विद्यापीठामध्ये /अधिविभागामध्ये /इमारतीमध्ये प्रवेश करताना विद्यापीठातील सुरक्षा विभागाकडील सुरक्षा रक्षकामार्फत आपण ओळखपत्र परिधान केले की नाही याबाबत पाहणी केली जाते. संबधितानी ओळखपत्रे परिधान न केल्यास सुरक्षा रक्षकांनी आपणास ओळखपत्रे परिधान करणेबाबत सुचित केल्यास त्यांना आपण सहकार्य करणे आपेक्षित आहे.

**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा.क्र. आस्थापना/** 374

**दि.** 02 MAR 2024

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, संचालक, यांचे कार्यालयास.

२) सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी व सेवक,

३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवक व विद्यार्थ्यांच्यां निदर्शनास आणावे.**